# सायबर सुरक्षेतबाबद विद्यार्थ्यांना मार्गदर्शन
# रावजी फटे विद्यालय खारशी येथील प्रकार




**कालिदास खोब्रागडे**
**लाखनी :-**
आधुनिक काळात विद्यार्थी, शिक्षक,पालक मोबाईल चा मोठया प्रमाणात वापर करतात. मोबाईल तसेच इंटरनेटमुळे आपले दैनंदिन कार्यक्रम सुकर झाले आहेत. सर्व कामे आज तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अगद-ी चुटकीसरशी होत असतात. या तंत्रज्ञानाचे अनेक फायदे आहेत.पण फायद्या बरोबर काही तोटेही आहेत आणि या धोक्यापासून सर्वांना सावध करण्याचे उद्देशाने जे. एम. पटेल महाविद्यालयातील सायबर योध्यानी रावजी फटे विद्यालयात खराशी येथे शनिवार (ता.३१ ऑगस्ट) रोजी सायबर सुरक्षेबाबद विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कु. रागिणी बाभरे, मंथन पशीने यांनी विदयार्थ्यांना मोबाईल तसेच इंटरनेटवर स्वतःला आणि आपल्या परिवारराला कसे सुरक्षित ठेवायचे याबद्दल मार्गदर्शन केले. या सायबर योध्यानी विविध उदाहरणांचा दाखला देत इंटरनेटवर कोणत्या गोष्टीपासून सावध राहायचे व काय काळजी घ्यायची जेणेकरून आपली माहिती सुरक्षित राहील याबद्दल विस्तृत माहिती दिली. याप्रसंगी अनेक विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेबाबत आपले शंकाचे समाधान करून घेतले. या उपक्रमामध्ये रावजी फटे विद्यालयाचे मुख्याध्यापक एस. वाय. शिवणकर यांनी सुद्धा शालेय जीवनात सायबर सुरक्षा किती महत्वाची आहे. याबाबद मार्गदर्शन केले. याप्रसंगी मुख्याध्यापक यांनी जे. एम. पटेल कॉलेजच्या सर्व सायबर योध्याचे कौतुक केले. एल. बी. कातोरे, एम. व्ही. वालूलकर, सी. डी. झलके, डी. बी. नागरिकर, एस. जी. रंगारी, एस. एल. मेश्राम व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहकार्य केले.